**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक -१६**

**विषय क्रमांक-१** **दिनांक २३ /१ /२००७**
**ठराव क्रमांक -१** **दिनांक २३/१/२००७**

**प्रस्तावाचा विषयः -** मा.स्थायी समिती सभा दिनांक २०/१२/२००६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

मा.स्थायी समिती सभा दिनांक २०/१२/२००६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- कार्यवृत्त मंजूर.
मा.श्री. जोशी अ.सु. :- दिनांक २०/१२/२००६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त मंजूर करावे.
मा.सभापती साहेब :- सर्वानुमते मागिल सभा दिनांक २०/१२/२००६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांत यावे .

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक २०/१२/२००६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :-मा.श्री. बारस्कर पो.ज.
अनुमोदक :-मा.श्री. जोशी अ.सु.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक -१६**

विषय क्रमांक -२ दिनांक २३/१ /२००७

ठराव क्रमांक -२ दिनांक २३/१/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे, सफाई कामगार यांचे खातेनिहाय चौकशीमध्ये ते दिनांक १०/८/२००० पासून कामावर गैरहजर असल्याचे शाबीत झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) अन्वये म.न.पा. सेवेतून काढून टाकणे ही प्रस्तावीत केलेली शिक्षा कायम करणे बाबत ऑफीस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-**

आरोपीत कामगार :- श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे, स.कामगार यांचे वरील चौकशीचा अहवाल

चौकशी अधिकारी :- श्री.आर.एम.ढाकणे, कामगार अधिकारी.

चार्ज ऑफीसर :- श्री.एन्.व्ही.जामगांवकर, केडगांव उप कार्यालय प्रमुख.

आरोपीत कामगार :- श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे, सफाई कामगार

सादर,

आरोपीत कामगार श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे, सफाई कामगार यांना आस्थापणा आदेश २४२५ दिनांक १७/११/२००५ अन्वये आरोपपत्र क्रमांक ५६७ दि.२/१२/२००५ चे देण्यांत आले ते असे

आपण दिनांक १०/८/२००० पासून कार्यालयाची पूर्वपरवानगी न घेता परस्पर कामावर वरिष्ठांची परवानगी न घेता परस्पर गैरहजर आहात याबाबत आपणांस आपण दिलेल्या पत्यावर रहात नसल्याने वर्तमान पत्रात जा.क्र. आस्थापणा ८१ दिनांक ८/४/२००५ अन्वये कारणे दाखवा नोटीस दिली. सदरच्या नोटीसीचा आपण अद्यापपावेतो खुलासा केलेला नाही या वरून आपणांस कामाची आवश्यकता नाही असे दिसून येते तुमचे सदरचे वर्तन ऑफीस शिस्तीस सोडून गंभीर स्वरूपाचे आहे.

तथापी सदरचे आरोपपत्र आरोपीत कामगारास कार्यालयीन शिपाई बजाविण्यासाठी वांरवार गेला असता त्या रहिवासी पत्यांवर रहात नसल्याने सदरचे आरोपपत्र त्यांना दिनांक २८/१/०६ च्या दैनिक लोकयुग मध्ये प्रसिध्द करून बजाविण्यांत आले .

आरोपीत कामगाराने आरोपपत्रास लेखी उत्तर दिलेले नाही. खातेनिहाय चौकाशी कामी आरोपीत कामगार हजर न राहिल्याने दिनांक १/८/२००६ रोजी आरोपीत कामगाराच्या गैरहजेरीत एकतर्फा सदर चौकशी कामकाज चालविणेचा आदेश करण्यांत आला.

चार्ज ऑफीसर यांनी आरोपीत कामगारा विरूध्द आरोपपत्र दाखल करून व युक्तीवाद सादर करून जास्तीत जास्त शिक्षा होणेची मागणी केलेली आहे आरोपीत कामगाराची नेमणूक तारीख १/७/१९९९ अशी असून नेमणूक तारखे पासून १०/८/२००० पावेतो आरोपीत कामगार ही १२ दिवस गैरहजर आहे.

आरोपीत कामगाराचे वर्तन पहाता त्यांचे विरूध्द आरोप शाबीत होत आहे. त्यामुळे ते शिक्षेस पात्र ठरत आहे.

आरोपीत कामगारा विरूध्द शिक्षेचा निर्णय घेतांना त्यांचा गैरहजर कालावधीचा देखील निर्णय होणे आवश्यक आहे

येणे प्रमाणे चौकाशी अहवाल आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे श्री.आर.एम्.ढाकणे चौकशी अधिकारी यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब(सा):-आरोपीत कामगार श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे (सफाई कामगार) दिनांक १०/८/२००० पासून कार्यालयाची पूर्व परवानगी न घेता अथवा कुठलाही रजेचा अर्ज न देता परस्पर कामावर गैरहजर असल्याचे शाबीत झालेले आहे. त्यांचा गैरहजर कालवधी फार मोठा आहे. आरोपीत कामगार रहात्या पत्यावर आढळून येत नसल्याने त्यांना दै. वर्तमान पत्रात गैरहजेरी बाबत कारणे दाखवा नोटीस देउन्नही तसेच दिनांक २८/१/२००६ च्या दै. लोकयुग मध्ये आरोप पत्र प्रसिध्द करूनही त्यांनी कुठलाही लेखी खुलासा दिला नाही व चौकशी कामी देण्यांत आलेली संधी गैरहजर राहून नाकारली या वरून त्यांची नोकरी बाबत बेफिकीरी व निष्काळजीपणा केल्याचे दिसून येत आहे त्यामुळे मुंबई प्रांतिक म.न.पा. अधि.१९४९ चे कलम ५६ (२) (ग) अन्वये मा.न.पा सेवेतुन काढून टाकणे ही शिक्षा देणे आवश्यक वाटते ही शिक्षा करणे पूर्वी म.न.पा अधि .५६ (१) चे परंतुक 'अ'अन्वये मा.स्थायी समिती ची पूर्व संम्मती घेणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावीत शिक्षा ही कठोर शिक्षा असल्याने कलम ५६ (३) अन्वये आपली बाजू मांडण्यासाठी कारणे दाखवा नोटीस देणे बंधन कारक आहे .तरी आदेशार्थ . दि.१४/०९/०६

मा.आयुक्त साहेब :- गैरहजर कालवधी किती आहे. ? संबंधीत कर्मचा-याचा शोध लागला की नाही.? फेर सादर करा दि.१८/०९/०६

फेर सादर,

आरोपीत कर्मचारी यांचा गैरहजर कालवधी आज अखेर ६ वर्षे २ महिने इतका आहे. केडगांव कार्यालयातील टपाल कर्मचारी व कार्या प्रमुख यांचे रिपोर्ट पाहता ते केडगांव च्या पत्यावर रहात नसल्याने कारणे दाखवा नोटीस तसेच आरोपपत्र दैनिक वर्तमान पत्रा मध्ये (दै.लोकयुग) प्रसिध्द करण्यांत येवूनही सदर कर्मचा-याने केडगांव कार्यालयात अथवा कामगार विभागा कडे चौकशी च्या कामी संपर्क साधला नाही अथवा हजर होउन्न अर्ज दिला नाही. नैसर्गिक न्यायतत्वा नुसार त्यांना पुरेशी संधी देण्यांत येवूनही त्यांनी मात्र गैरहजर राहून दिलेली संधी नाकारलेली आहे .तरी चौकशी अहवाल ओदशार्थ .

येणे प्रमाणे चौकशी अधिकारी यांचे फेर सादर अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- आदेशार्थ फेर सादर .दि.१९/०९/२००६

मा.आयुक्त साहेब :- प्रस्तावीत शिक्षेबद्दल अंतीम कारणे दाखवा नोटीस संबंधीतास द्यावी दि.२१/०९/०६

फेर सादर,

आरोपीत कर्मचारी श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे, सफाई कामगार यांचे दोषसिध्दी नंतर त्यांना जा.न. कामगार १७६१ दि.२६/९/२००६ अन्वये म.न.पा सेवेतुन कमी का करण्यांत येउ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस काढण्यात आली तथापी सदर कर्मचारी हे दिलेल्या रहिवासी पत्यावर रहात नसल्याने शेवटच्या माहित असलेल्या पत्यावर सदरची नोटीस ची डकवून बजावणी केली आहे. तसेच सदरची नोटीस दि.१८/१०/२००६ रोजीच्या दैनिक लोकयुग या वर्तमान पत्रातुन प्रसिध्द करून बजावण्यांत आली आहे.तथापी सदरची नोटीस प्रसिध्द होउन्न आजतागायात त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधला नाही. अथवा कुठल्याही प्रकारचा खुलासा इकडेस सादर केला नाही असा अहवाल केडगावं विभाग प्रमुख यांनी दि. ६/११/२००६ रोजी दिलेला आहे .तसेच श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे यांचा या बाबत खुलासा इकडेस दाखल प्राप्त झालेला नाही.

तरी आदेशार्थ फेर सादर असे.

येणे प्रमाणे चौकशी अधिकारी यांचा अहवाल फेर सादर असे.

मा.उपायुक्त साहेब (कर):- आरोपीत कर्मचा-यांस प्रस्तावीत शिक्षे बाबत कारणे दाखवा नोटीस त्यांचे शेवटच्या रहाण्याच्या ठिकाणी डकवून बजावणी करणेत आली तसेच दि.१८/१०/२००६ च्या दै. लोकयुग मध्येही प्रसिध्द करणेत आली असे असतांना ही सदर कर्मचा-यांने या नोटीसीचा कुठलही खुलासा दिला नाही अथवा कार्यालयाशी संपर्क साधला नाही. यास्तव त्यांची गैरहजेरीची व बेफिकीरीची वृत्ती तसेच त्यांना नोकरीची आवश्यकता नसल्याचे दिसून येते यास्तव प्रस्तावीत शिक्षा कायम करणे योग्य होईल .तरी आदेशार्थ तसेच प्रकरण मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस्तव आदेशार्थ .दि.९/११/२००६

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.९/११/२००६

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे, सफाई कामगार यांचे खातेनिहाय चौकशीमध्ये ते दिनांक १०/८/२००० पासून कामावर गैरहजर असल्याचे शाबीत झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) अन्वये म.न.पा. सेवेतून काढून टाकणे ही प्रस्तावीत केलेली शिक्षा कायम करणे बाबत ऑफीस रिपोर्ट आदेशार्थ.हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- सदरचे कर्मचा-यास काय नोटीस दिली होती.

कामगार अधिकारी श्री.ढाकणे :- श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे, सफाई कामगार श्री.रविंद्र बबन भोर गार्डन बिगारी यांना त्यांनी दिलेल्या पत्त्यावर ते रहात नसल्याने वर्तमान पत्रातुन कारणे दाखवा नोटीस दिली तसेच आरोप पत्र ही वर्तमान पत्रातुन बजावण्यांत आले परंतु ते गैरहजर राहिल्याने त्यांचे सह श्री. सतिष माणिक झेंडे लिपीक यांची एकतर्फा चौकशी करण्यांत आली.

मा.सभापती साहेब :- आजचे सभे पुढे हजर रहाण्यासाठी त्यांना पत्र दिले आहे का?

कामगार अधिकारी श्री.ढाकणे :- होय.

मा.सभापती साहेब :- त्यांना सभे समोर बोलावण्यांत यावे.

त्या प्रमाणे श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे, सफाई कामगार, श्री. सतिष माणिक झेंडे लिपीक, श्री. रविंद्र बबन भोर बिगारी, सौ. सुनिता रवी कांबळे बिगारी यांना सभे समोर हजर होण्यासाठी श्री बढेकर एस.एस. शिपाई यांचे मार्फत पुकारले असता. सदरचे चारही कर्मचारी सभे पुढे गैरहजर असल्याचे आढळले.

मा.श्री.घुले अ.ह.,व मा.श्री. बारस्कर पो.ज :- ऑफीस रिपोर्टा नुसार मंजूर करावे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- मा.स्थायी समिती समोर सदरचे चारही कर्मचारी त्यांना बोलावण्यांत येउन ही ते गैरहजर आहेत. त्यांना वेळावेळी संधी देउन सुध्दा त्यांना नोकरीची आवश्यकता नसल्याचे आढळते कार्यालयीन प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे स.का, श्री. सतिष माणिक झेंडे लिपीक, श्री. रविंद्र बबन भोर बिगारी, व सौ. सुनिता रवि कांबळे यांचे बडतर्फी प्रकरणी सर्वानुमते कार्यालयाने सादर केलेल्या ऑफीस रिपोर्टास मंजूरी देण्यांत येत आहे.

**ठराव :-** श्रीमती रेणूका लक्ष्मण धोत्रे, सफाई कामगार यांचे खाते निहाय चौकशी मध्ये ते दिनांक १०/८/२००० पासून कामावर गैरहजर असल्याचे शाबीत झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) अन्वये म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे ही प्रस्तावीत केलेली. शिक्षा कायम करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. जोशी अ.सु.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक -१६**

विषय क्रमांक -३ दिनांक२३/०१/२००७

ठराव क्रमांक -३ दिनांक २३/०१/२००७

**प्रस्तावाचा विषयः -** श्री. सतिष माणिक झेंडे लिपिक यांचे खातेनिहाय चौकशी मध्ये ते दिनांक १५/१२/१९९९ पासून कामावर गैरहजर असल्याचे शाबीत झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२ )(ग) अन्वये म.न.पा. सेवेतुन कमी करणे ही प्रस्तावीत केलेली शिक्षा कायम करणे बाबत ऑफीस रिपोर्ट आदेशार्थ .

**प्रस्तावाचा मजकुर-**आरोपीत कामगार श्री.सतिष माणिक झेंडे,लिपिक यांचे वरील चौकशीचा अहवाल

चौकशी अधिकारी :- श्री.आर.एम्.ढाकणे ,कामगार अधिकारी .

चार्ज ऑफीसर :- श्री. एन.व्ही. जामगांवकर, केडगांव उपकार्यालय प्रमुख .

आरोपीत कामगार :- श्री.सतिष माणिक झेडे,लिपिक

सादर,

आरोपीत कामगार श्री.सतिष माणिक झेंडे लिपीक यांना आस्थापणा आदेश १११९ दिनांक १४/७/२००५ अन्वये आरोपपत्र क्रमांक २६५ दि.४ /८ /२००५ चे देण्यांत आले ते असे

आपण दिनांक १५/१२/९९ पासून कार्यालयाची पूर्व परवानगी न घेता परस्पर कामावर वरिष्ठांची परवानगी न घेता परस्पर गैरहजर आहात याबाबत आपणांस जा.क्र. आस्थापणा ८१ दिनांक ८/४/२००५ अन्वये कारणे दाखवा नोटीस दिली. सदरच्या नोटीसीचा आपण अद्याप पावेतो खुलासा केलेला नाही या वरून आपणांस कामाची आवश्यकता नाही असे दिसून येते.तुमचे सदरचे वर्तन ऑफीस शिस्तीस सोडून गंभीर स्वरूपाचे आहे.

आरोपीत कामगाराने आरोप पत्रास लेखीउत्तर दिलेले नाही .खातेनिहाय चौकशी कामी आरोपीत कामगार हजर न राहिल्याने दिनांक ३०/८/२००६ रोजी आरोपीत कामगाराच्या गैरहजेरीत एकतर्फा सदर चौकशी कामकाज चालविणेचा आदेश करण्यांत आला.

चार्ज ऑफीसर यांनी आरोपीत कामगारा विरूध्द आरोपपत्र दाखल करून व युक्तीवाद सादर करून जास्तीत जास्त शिक्षा होणेची मागणी केलेली आहे आरोपीत कामगाराची नेमणूक तारीख १/७/१९९९ अशी आहे.

आरोपीत कामगाराचे वर्तन पहाता त्यांचे विरूध्द आरोप शाबीत होत आहे. त्यामुळे ते शिक्षेस पात्र ठरत आहे.

आरोपीत कामगारा विरूध्द शिक्षेचा निर्णय घेतांना त्यांचा गैरहजर कालावधीचा देखील निर्णय होणे आवश्यक आहे

येणे प्रमाणे चौकशी अहवाल आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे चौकाशी अधिकारी श्री. आर.एम्.ढाकणे यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब (कर) :- आरोपीत कर्मचारी दिनांक १५/१२/९९ पासून म्हणजे साधारणतः ग्रामपंचायतीचे रूपांतर नगर परिषदेत झाल्या पासून परस्पर कामावर गैरहजर आहे.अनेक वेळा लेखी कळवून व कारणे दाखवा नोटीस देउत्न ही त्यांनी त्यावर खुलासा दिला नाही किंवा तेकामावरही हजर झाले नाही.सुमारे ७ वर्ष ते सतत गैरहजर आहेत.याबाबत त्याचे वर आरोपपत्र भरण्यांतआले त्यांस त्यानी उत्तर दिले नाही तसेच चौकशी कामी नोटीसा बजावून ही ते हजर राहिले नाहीत त्यांना देण्यांत आलेली बचावाची संधी त्यांनी नकारलेली आहे. या वरून त्यांना नोकरीची आवश्यकता नसल्याचे शाबीत होत आहे यास्तव त्यांना म.न.पा अधि.१९४९चे कलम ५६ (२) (ग) नुसार सेवेतुन कमी करणे योग्य होईल सदर शिक्षेस मा.स्थायी समितीची मंजूर घ्यावी लागेल.तसेच प्रस्तावीत शिक्षे बाबत.म.न.पा अधिनियम कलम ५६ (१) (अ) अन्वये कारणे दाखवा नोटीस द्यावी लागेल .तरी आदेशार्थ सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.३०/१०/२००६

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**ठराव :-** श्री. सतिष माणिक झेंडे लिपीक यांचे खातेनिहाय चौकशी मध्ये ते दिनांक १५/१२/१९९९ पासून कामावर गैरहजर असल्याचे शाबीत झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) अन्वये म.न.पा. सेवेतुन कमी करणे ही प्रस्तावीत केलेली शिक्षा कायम करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.
सुचक :- मा.श्री. जोशी अ.सु.
अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.
ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक -१६**

विषय क्रमांक -४ दिनांक २३/०१/ २००७

ठराव क्रमांक -४ दिनांक २३/०१/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. रविंद्र बबन भोर बिगारी यांचे खाते निहाय चौकशी मध्ये ते दिनांक ३०/१२/२००० पासून कामावर गैरहजर असल्याचे शाबीत झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) अन्वये म.न.पा. सेवेतून काढून टाकणे ही प्रस्तावीत केलेली शिक्षा कायम करणे बाबत ऑफीस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-**आरोपीत कामगार श्री. रविंद्र बबन भोर, गार्डन बिगारी यांचे वरील चौकशीचा अहवाल

चौकशी अधिकारी :- श्री. आर.एम्.ढाकणे कामगार अधिकारी .

चार्ज ऑफीसर :- श्री.एन्.व्ही.जामगांवकर, केडगांव उपकार्यालय प्रमुख

आरोपीत कामगार :- श्री.रविंद्र बबन भोर ,गार्डन बिगारी .

सादर,

आरोपीत कामगार श्री.रविंद्र बबन भोर गार्डन बिगारी यांना आस्थापणा आदेश २४२५ दिनांक १७/११/२००५ अन्वये आरोप पत्र क्रमांक ५६५ दि.२/१२/२००५ चे देण्यांत आले ते असे

आपण दिनांक ३०/१२/२००० पासून कार्यालयाची पूर्व परवानगी न घेता परस्पर कामावर वरिष्ठांची परवानगी न घेता परस्पर गैरहजर आहात याबाबत आपणांस आपण दिलेल्या पत्यावर रहात नसल्याने वर्तमानपत्रात जा.क्र. आस्थापणा ८१ दिनांक ८/४/२००५ अन्वये कारणे दाखवा नोटीस दिली. सदरच्या नोटीसीचा आपण अद्याप पावेतो खुलासा केलेला नाही या वरून आपणांस कामाची आवश्यकता नाही असे दिसून येते .तुमचे सदरचे वर्तन ऑफीस शिस्तीस सोडून गंभीर स्वरूपाचे आहे.

तथापी सदरचे आरोपपत्र आरोपीत कामगारास कार्यालयीन शिपाई बजावण्यासाठी वांरवार गेला असता तो रहिवासी पत्यांवर रहात नसल्याने सदरचे आरोप पत्र त्यांना दिनांक २८/१/०६ च्या दैनिक लोकयुग मध्ये प्रसिध्द करून बजाविण्यांत आले .

आरोपीत कामगाराने आरोपपत्रास लेखी उत्तर दिलेले नाही. खातेनिहाय चौकाशी कामी आरोपीत कामगार हजर न राहिल्याने दिनांक १/८/२००६ रोजी आरोपीत कामगाराच्या गैरहजेरीत एकतर्फा सदर चौकाशी कामकाज चालविणेचा आदेश करण्यांत आला.

चार्ज ऑफीसर यांनी आरोपीत कामगारा विरूध्द आरोपपत्र दाखल करून व युक्तीवाद सादर करून जास्तीत जास्त शिक्षा होणेची मागणी केलेली आहे आरोपीत कामगाराची नेमणूक तारीख १/७/१९९९ अशी असून नेमणूक तारखे पासून ३०/१२/२००० पावेतो आरोपीत कामगार हा ५१ दिवस गैरहजर आहे.

आरोपीत कामगाराचे वर्तन पहाता त्यांचे विरूध्द आरोप शाबीत होत आहे. त्यामुळे ते शिक्षेस पात्र ठरत आहे.

आरोपीत कामगारा विरूध्द शिक्षेचा निर्णय घेतांना त्यांचा गैरहजर कालावधीचा देखील निर्णय होणे आवश्यक आहे

येणे प्रमाणे चौकशी अहवाल आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे चौकशी अधिकारी श्री. आर.एम.ढाकणे यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब(सा) :- आरोपीत कामगार श्री. रविंद्र भोर (गार्डन बिगारी) दिनांक ३०/१२/२००० पासून कुठलाही रजेचा अर्ज न देता परस्पर कामावर गैरहजर असल्याचे शाबीत झालेले आहे. त्यांचा गैरहजर कालवधी सुमार ६ वर्षाचा आहे आरोपीत कामगार रहात्या पत्यावर आढळून येत नसल्याने त्यांना दै. वर्तमानपत्रात गैरहजेरी बाबत कारणे दाखवा नोटीस देउन्नही तसेच दिनांक २८/१/२००६ च्या दै. लोकयुग

मध्ये आरोपपत्र प्रसिध्द करूनही त्यांनी कुठलाही लेखी खुलासा दिला नाही व चौकशी कामी देण्यांत आलेली संधी गैरहजर राहून नाकारली या वरून त्यांची नोकरी बाबत बेफिकीरी व निष्काळजी पणा केल्याचे दिसून येत आहे

त्यामुळे मुंबई प्रांतिक म.न.पा. अधि.१९४९ चे कलम ५६ (२) (ग) अन्वये म.न.पा सेवेतुन काढून टाकणे ही शिक्षा देणे आवश्यक वाटते ही शिक्षा करणे पूर्वी म.न.पा अधि .५६ (१) चे परंतुक 'अ'अन्वये मा.स्थायी समिती ची पूर्व संम्मती घेणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावीत शिक्षा ही कठोर शिक्षा असल्याने कलम ५६ (३) अन्वये आपली बाजू मांडण्यासाठी कारणे दाखवा नोटीस देणे बंधन कारक आहे .तरी आदेशार्थ .दि.१९/०९/२००६

मा.आयुक्त साहेब :- प्रस्तावीत शिक्षे बध्दल अंतीम कारणे दाखवा नोटीस काढा . दि.२१/०९/०६

फेर सादर,

आरोपीत कर्मचारी श्री.रविंद्र बबन भोर उघ्यान बिगारी यांचे दोषसिध्दी नंतर त्यांना जा.न. कामगार १७६२ दि.२६/९/०६ अन्वये म.न.पा. सेवेतुन कमी का करण्यांत येउ नये या बाबत कारणे दाखवा नोटीस काढण्यांत आली तथापी सदर कर्मचारी हे रहिवासी पत्यावर रहात नसल्याने शेवटच्या माहित असलेल्या पत्यावर सदर नोटीसीची डकवून बजावणी केली आहे तसेच सदरची नोटीस दि. १८/१०/०६ रोजीच्या दैनिक लोकयुग या वर्तमानपत्रा मधून प्रसिध्द करून बजावण्यांत आली आहे. तथापी सदरची नोटीस प्रसिध्द होउन आजतागायत त्यांनी कार्यालयाशी कुठल्याही प्रकारे संपर्क साधलेला नाही तसेच कुठल्याही प्रकारचा खुलासा इकडेस सादर केलेला नाही असा अहवाल केडगांव विभाग प्रमुख यांनी दि.६/११/२००६ रोजी दिलेला आहे. तसेच श्री. रविंद्र बबन भोर उघ्यान बिगारी यांचा या बाबत चा खुलासा इकडेस देखिल प्राप्त झालेला नाही .तरी आदेशार्थ फेर सादर असे.

येणे प्रमाणे श्री.ढाकणे आर.एम् . यांचा अहवाल फेर सादर असे.

मा.उपायुक्त साहेब (कर) :- आरोपीत कर्मचा-यांस प्रस्तावीत शिक्षे बाबत कारणे दाखवा नोटीस त्यांचे शेवटच्या रहाण्याच्या ठिकाणी डकवून बजावणी करणेत आली तसेच दिनांक १८/१०/२००६ च्या दैनिक लोकयुग मध्ये ही प्रसिध्द करणेत आली असे असताना ही सदर कर्मचा-याने या नोटीसीचा कुठलाही खुलासा दिला नाही अथवा कार्यालयाशी संपर्क साधला नाही. यास्तव त्यांची गैरहजेरीची व बेफिकीरीची वृत्ती तसेच त्यांना नोकरीची आवश्यकता नसल्याचे दिसून येते यास्तव प्रस्तावीत शिक्षा कायम करणे योग्य होईल .तरी आदेशार्थ तसेच प्रकरण मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस्तव आदेशार्थ. दि. ०९/११/२००६

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.०९/११/२००६

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**ठराव :-** श्री.रविंद्र बबन भोर बिगारी,यांचे खाते निहाय चौकशी मध्ये ते दिनांक ३०/१२/२००० पासून कामावर गैरहजर असल्याचे शाबीत झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) अन्वये म.न.पा सेवेतुन काढून टाकणे ही प्रस्तावीत केलेली शिक्षा कायम करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.
सुचक :- मा.श्री. जोशी अ.सु.
अनुमोदक :- मा.श्री.बारस्कर पो.ज.
ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १६**

विषय क्रमांक -५ दिनांक २३ /०१/२००७

ठराव क्रमांक- ५ दिनांक २३/०१/२००७

**प्रस्तावाचा विषय -** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२ )(ग)नुसार सौ. सुनिता रवी कांबळे बिगारी यांना म.न.पा. सेवेतुन बडतर्फे करणे बाबत प्रस्तावीत केलेल्या शिक्षे प्रकरणी म.न.पा.चे विधीज्ञाचे मतासह कार्यालयीन प्रस्ताव सुस्पष्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** सादर,

सौ. सुनिता रवी कांबळे (बिगारी केडगांव विभाग) चा दि.१/१२/९९ पासून अर्ज न देता अथवा ऑफीसची पूर्व परवानगी न घेता परस्पर गैरहजर राहिल्याने त्यांचे विरूध्द खातेनिहाय चौकशीचा आदेश झालेला होता. त्या नुसार त्यांचे वरील आरोपपत्र क्र. ६१९ दि.३०/५/२००५ अन्वये भरणेत येउत्न नियमानुसार व पूर्ण संधी देणेत येउत्न खातेनिहाय चौकशी पूर्ण करून चौकशी अहवाल सादर करण्यांत आला .त्या वर त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार पुढे नोकरी मिळण्यांस अपात्र होणार नाही अशा प्रकारे म.न.पा. सेवेतुन काढून टाकण्यांत येत आहे हि शिक्षा प्रस्तावीत करून त्यावर कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली. या नोटीसीस सौ. कंाबळे यांनी खुलासा दिला नाही.सबब प्रस्तावीत शिक्षा कायम करण्यांत येउत्न म.न.पा. अधि.१९४९ चे कलम ५६ (१) चे परंतुक "अ" नुसार पूर्व मान्यते साठी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यांत आले त्यावर मा.स्थायी समितीने ठराव क्र. ८ दिनांक १९/१/२००६ अन्वये सदर प्रकरणी महानगरपालिकेचे कायदेशिर सल्लागार यांचे मत घेण्यांत यावे व आलेल्या मता प्रमाणे मा.आयुक्त साहेबांनी पुढील कार्यवाही करावी असा ठराव पारित केला त्यानुसार म.न.पा. विधिज्ञ श्री. एस्.के.पाटील .ॲड.यांचे कायदेशिर मत मागविण्यांत आले असतां त्यांनी दि.१८/२८-२-२००६ च्या पत्राने खालील प्रमाणे कायदेशीर मत दिले आहे.

वरील विषयां संबंधी आपले पत्र व त्या सोबतचा ठराव क्रमांक ८ दि.१९/१/२००६ पहाता असे दिसून येते की, संबंधीत कामगारास गैरहजेरी कारणावरून आरोपपत्र देण्यांत आले.त्यावर संबंधीत कामगाराने त्यांचे वर ठेवलेले आरोप कबुल केले आहेत व एक वेळ माफ करून कामावर हजर करून घ्यावे अशी विनंती केलेली आहे. संबंधीत कर्मचा-यांचा एकूण सेवाकाळ विचारात घेता गैरहजेरीचा काळ फार मोठा असून दोषारोप सिध्द झाले आहे.

त्यामुळे नियमातील तरतूदीनुसार म.न.पा सेवेतुन कमी करण्यांत येत आहे तसेच अशी शिक्षा का करण्यांत येउ नये अशी कारणे दाखवा नोटीस दिली असता संबंधीत कामगाराने नोटीसीला खुलासा दिलेला नाही.

एकंदरीत कामगाराच्या वर्तना बाबत म्हणजेच गैरहजर कालावधीचे स्वरूप पहाता त्यांचा गैरहजर कालवधी फार मोठा आहे. सदरची बाब गंभीर अशी असून त्या बाबतचा निर्णय आलेल्या पुराव्याच्या अधारे मा.आयुक्त साहेबांनी घेतलेला आहे. तसेच स्थायी समिती ने देखिल त्यावर चर्चा करून कायदेशीर मत घेउत्न मा. आयुक्त साहेब यांनी कार्यवाही करावी असे सुचित केलेले आहे. तरी माझ्या मते गैरहजर कालावधीचा विचार करता संबंधीत कामगाराचे गैरहजर बाबतचे वर्तन हे गंभीर स्वरूपात मोडणारे आहे. त्या अनुषंगाने निर्णय घेणे उचित होईल असे माझे कायदेशीर मत आहे असे मत दिलेले असून ते सोबत आहे.

तरी सदर प्रकरणी मा.स्थायी समिती ठराव नं. ८ दिनांक १९/१/२००६ च्या अनुषंगाने श्री. एस्.के.पाटील ॲड. यांचे कायदेशीर मत ऑफीस प्रस्तावासह आदेशार्थ ठेविले असे.

येणे प्रमाणे चौकशी अधिकारी तथा कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- सुस्पष्ट ठरावा साठी पाठविणे योग्य ./अ

मा.आयुक्त साहेब :- समक्ष चर्चा करा. उपायुक्त + चौ. अ.

मा.प्र.आयुक्त साहेब :- चर्चा झाली 'अ' प्रमाणे कार्यवाही साठी पाठवा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**ठराव :-**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२ ) (ग)नुसार सौ. सुनिता रवी कांबळे बिगारी यांना म.न.पा. सेवेतुन बडतर्फेकरणे बाबत प्रस्तावीत केलेली शिक्षा कायम करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.
सुचक :- मा.श्री.जोशी अ.सु.
अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.
ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक -१६**

विषय क्रमांक -६ दिनांक २३ /१ / २००७

ठराव क्रमांक -६ दिनांक २३ /१/२००७

**प्रस्तावाचा विषयः -** अहमदनगर महानगरपालिकेचा शहर विकास आराखडा सन २०३१ चा विकास प्रकल्प आराखडा ( डी.पी.आर) बनविणे कामी खाजगी कंन्सलटटं नेमणे करितां मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-**उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट देण्यांत येतो की,अहमदनगर महानगरपालिकेचा सी.डी.पी. चा.,डी. पी.आर. तयार करणे बाबत खाजगी कंन्सलटंट नेमणेकरितां दैनिक लोकमत मध्ये दिनांक २/१२/२००६ रोजी जाहीर निविदा प्रसिध्द करण्यांत आली होती .सदर निविदेची विक्री दिनांक १५/१२/२००६ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यत करण्यांत आली व त्याच दिवशी दुपारी २.०० वाजे पर्यत निविदा दाखल करण्यांची मुदत होती. मुदतीत तीन निविदा प्राप्त झाल्या त्याच दिवशी रोजी ५.०० वाजता सदरच्या निविदा मा.उपायुक्त (कर) यांचे समोर उघडण्यात आल्या त्याचा तुलणात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ. नं. | एजन्सीचे नांव | नमुद केलेले दर. |
|---|---|---|
| १ | सन्कॉन इंजिनिअर्स प्रा.लि.पुणे. | १) १० कोटी प्रोजेक्ट कॉस्ट पर्यत एस्टीमेट रकमेच्या १.७५%+सर्व चार्जेस.<br>२) ५० कोटी प्रोजेक्ट कॉस्ट पर्यत एस्टीमेट रकमेच्या १.५०%+ सर्व चार्जेस.<br>३) ५० कोटी पेक्षा जास्त प्रोजेक्ट कॉस्ट साठी एस्टीमेट रकमेच्या १.२५%+ सर्व चार्जेस.<br>किंवा<br>४) ५० कोटी पेक्षा जास्त प्रोजेक्ट कॉस्ट साठी एस्टीमेट रकमेच्या २% (सर्व चार्जेस धरून) |
| २ | सॉलिड कोअर कंन्सलन्टट प्रा.लि. लातूर | एकूण प्रोजेक्ट कॉस्टच्या ०.८० % |
| ३ | स्पेसिया कंन्सलटंट पुणे | एकूण प्रोजेक्ट कॉस्टच्या २ % |

वरील तुलणात्मक तक्ता पाहता सॉलीड कोअर कंन्सलटंट प्रा.ली. लातूर यांनी निविदेत नमुद केलेले दर एकूण प्रोजेक्ट कॉस्टच्या ०.८० % हे प्राप्त निविदां मधील सर्वात कमी दर आहेत परंतु संबंधीत कमी दराच्या निविदा धारकाशी दराबाबत वाटाघाटी करून निर्णय घेणे योग्य होईल.

तरी पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

शहर अभियंता श्री. एन. बी.मगर :- अहवालाप्रमाणे सॉलिड कोअर कन्सलटंट लातूर यांचेशी निविदा दरा बाबत वाटाघाटी करून निर्णय घेणे योग्य आदेशार्थ सादर. दि. १६/१२/०६

अं.लेखा परिक्षक :- निगोशिएशन करणेस हरकत नाही . दि.१८/१२/०६ /अ

मा. उपायुक्त साहेब (सा) :- "अ" नुसार आदेशार्थ सादर. दि.२०/१२/०६

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सादर,

उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट देण्यांत येतो की,अहमदनगर महानगरपालिकेच्या सी.डी.पी.चा. डी.पी.आर .तयार करणे बाबत कमी दराचे निविदा धारक सॉलिड कोअर कंन्सलटंट प्रा.लि. यांना जा.क्र. बांधकाम -१६६४ दि. २२/१२/२००६ अन्वये सदर कामाच्या दरा बाबत वाटाघाटी करिता आज दि.२६/१२/२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.आयुक्त साहेब यांचे दालनात बोलविले होते त्या प्रमाणे मा.आयुक्त साहेब यांचे दालनात मा. उपायुक्त सामान्य, सॉलिड कोअर कंन्सलटंट प्रा.लि. यांचे प्रतिनिधी श्री. पी.के. पाटील व शहर अभियंता यांचे समवेत वाटाघाटी झाल्या त्यानुसार श्री. पाटिल यांनी सदर काम निविदे मध्ये भरलेल्या प्रकल्प किंमतीच्या ०.८० % या ऐवजी प्रकल्प किमंतच्या ०.७८ % या प्रमाणे सदर काम करण्यांस लेखी संमती दिली आहे. तरी सदरचे दर वाजवी वाटतात तरी मंजूरीस्तव तथा आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता श्री. एन्. बी.मगर यांचा अहवाल असे. दि.२६/१२/२००६.

अं. लेखा परिक्षक :- शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे प्रकल्प किंमतीच्या ०.७८% दराने मान्यता देणेस हरकत नाही .दि.२७/१२/२००६

मा.उपायुक्त साहेब (सा) :- अहवालानुसार प्रस्ताव मान्यते साठी मा.स्थायी समिती समोर ठेवणेस शिफारस आहे. दि.२७/१२/२००६

मा.आयुक्त साहेब :- निविदा स्टँडिंग कमिटी समोर ठेउन्न सादर करणे . दि.२७/१२/२००६.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर,

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:- ऑफीस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे ऑफीस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. त्रिपाठी सु.च.:- निविदा धारका यांचेशी कोणत्या प्रश्नावर वाटाघाटी केल्या आहेत.

शहर अभियंता श्री.मगर :- कमीचे निविदा दर धारक यांचेशी दरा बाबत वाटाघाटी केलेल्या आहेत.

मा.श्री.त्रिपाठी सु.च.:- त्यांनी सर्व कागद पत्रांची पूर्तता केलेली आहे का? तीनही निविदा कार यांनी त्यांचे पॅन कार्ड नं. दिलेले आहेत का ?

शहर अभियंता श्री.मगर :- पॅन कार्ड नंबर मागाविलेले नाहीत.

मा.उपायुक्त साहेब (सा.):- आपण मागणी केली असेल तर त्यांनी दिले असते. मागणी केली नाही त्यामुळे ते देणार नाहीत.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं. :- आपले कार्यालयीन प्रस्तावाचे प्रकरणातील पान नं.१६४ वर सदरचे फर्म कडून मागिल तीन वर्षाचे बॅलन्स शीटची मागणी केली त्या प्रमाणे त्यांनी पूर्तता केलेली आहे का.?

शहर अभियंता श्री.मगर :- सॉलीड कोअर कंन्सलटटं प्रा.ली. लातुर यांनी फर्मचे रजिस्ट्रेशन इन्कम टॅक्स बाबत माहिती दिलेली असून त्यांनी अनामत रक्कम भरलेली आहे. त्यांचे बॅलन्स शीट ही आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- तीन वर्षाचे बॅलन्स शीटची मागणी करता ते त्यांनी दिलेले नाही. सन्कॉन कंपणीने पांच वर्षाचे बॅलन्स शीट दिलेले आहे.

मा.उपायुक्त साहेब (सा.) :- दोन लिफाफे पध्दतीने निविदा मागाविण्यांत येतात. तेव्हा पहिला लिफाफा उघडले नंतर तो परिपूर्ण असल्यासच दूसरा दरा बाबतचा लिफाफा उघडणेत येतो

मा.श्री. जोशी अ.सु. :- हा कंन्सलटंट जितका निधी मिळवून देईल. तेवढया रकमेच्या कामाचेच त्यांना दरा प्रमाणे पेमेंट होईल.

मा.श्री. त्रिपाठी सु.च :- सन्कॉन फर्मने बरीच काम केलेली आहेत.

मा.उपायुक्त साहेब (सा.) :- या प्रकरणी प्री बीड मिटींग झालेली आहे. ऑफीसने केलेली कारवाई योग्य आहे.इतर च्योवीस शहराचे मनपाचे प्रस्ताव दाखल झालेले आहेत. या योजने मध्ये ८०० कोटीचा निधी उपलभ्द आहे. जो प्रथम त्यास निधी मिळेल आपण अजून डी.पी.आर ची एजन्सी सुध्दा निश्चित केलेली नाही. आपला प्रोजेक्ट कसा पूर्ण होणार.

मा.सभापती साहेब :- सदस्यांचे मागणी प्रमाणे करारनाम्याचे वेळी आवश्यक कागद पत्रांची पूर्तता करून घेउ.

मा.श्री. जोशी अ.सु. :- प्रशासन ती काळजी घेईल.ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- संबंधीता कडून आवश्यक त्या कागद पत्रांची पूर्तता करून घ्यावी. .नंतर पुढील कार्यवाही करावी.

मा.सभापती साहेबः-ऑफीस रिपोर्टा नुसार पुढील कार्यवाही करावी.सर्वानुमते ऑफीस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचा शहर विकास आराखडा सन २०३१ चा विकास प्रकल्प आराखडा (डी.पी.आर) बनविणे. कामी खाजगी कंन्सलटंट नेमणे करितां मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता. सॉलीड केआर कंन्सलटंट प्रा.ली लातुर यांचे प्रतिनिधी श्री.पी.के. पाटील यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या (प्रकल्प किंमती च्या ०.७८%) कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. जोशी अ.सु.

अनुमोदक :- मा.श्री.त्रिपाठी सु.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.